## दिनांक 12.1.2024 रोजी प्राप्त प्रशासकीय विषय
( प्रशासकीय विषय )

विषय क्रमांक 154:- अमरावती महानगरपालिका (सरळ सेवा भरती /पदोन्नती) सेवा ( सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०२४ मान्यता देणेबाबत.

ठराव क्रमांक 154:- महाराष्ट्र शासन अधिसूचनानुसार अमरावती नगरपरिषद व बडनेरा नगर परिषदेचे विलीनीकरण होऊन अमरावती महानगरपालिकेची दिनांक १५ऑगस्ट १९८३ रोजी स्थापना करण्यात आली असून महानगरपालिकेचे कार्यक्षेत्र १२१.६५ चौरस किलोमीटर आहे .सन २०११ जनगणनेनुसार शहराची लोकसंख्या ६.४७ लक्ष होती. कोविड -२०१९ ची महामारी परिस्थिती उद्भवल्यामुळे सन २०२१ ची जनगणना होऊ शकली नाही परंतु अमरावती शहराची सध्या स्थितीत लोकसंख्या सुमारे ०९ लक्ष पेक्षा अधिक आहे, महानगरपालिकेच्या स्थापनेनंतर प्रशासकीय कामकाज सुरळीत चालण्याच्या दृष्टीने शासन स्तरावरून व तत्कालीन वेळी मा. प्रशासकांनी/ सर्वसाधारण सभेने मनुष्यबळाच्या आवश्यकतेनुसार वेळोवेळी विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास मंजुरी दिलेली आहे सध्या स्थितीत अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकरणात झालेली वाढ, औद्योगिक क्षेत्र, केंद्र व राज्य शासनाचे महत्त्वाचे उपक्रम/ संस्था/ प्रकल्प यामुळे पायाभूत सुविधावर पडणारा ताण तसेच नागरी स्थानिक संस्थेची भूमिका, कर्तव्य व जबाबदारी पार पाडत असताना अमरावती महानगरपालिकेला आवश्यक असलेली गट -१ ते गट -४ मधील नवनिर्मित पदांची आवश्यकता विचारात घेऊन तसेच अमरावती महानगरपालिका आस्थापनेवर शासन निर्णयानुसार व अमरावती महानगरपालिकेच्या ठरावांन्वये मंजूर असलेला संवर्ग निहाय एकूण २०८७ व मा. प्रशासक ठराव क्रमांक १५३ दिनांक १२.०१.२०२४ रोजी शासनाच्या मान्यता करिता सादर करण्यात आलेला आहे,

सदर पदाचा तपशील खालील प्रमाणे आहे .

| अ.क्र. | प्रवर्ग | १)शासन मंजुर पदसंख्या. २)प्रशासक ठरावान्वये मंजुर पदसंख्या | कार्यरत पदे | रिक्त पदे | नव निर्मित पदांची संख्या | व्यपगत पदे | एकुण पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | वर्ग-१ | ३० | २० | १० | १२ | ०० | ४२ |
| २ | वर्ग-२ | ६४ | ३६ | २८ | ११ | ०२ | ७३ |
| ३ | वर्ग-३ | ७२२ | ३६३ | ३५९ | २५७ | ५७ | ९२२ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | वर्ग-४ | १६४१ | ८२४ | ८१७ | ०० | ५९१ | १०५० |
| एकुण वर्ग-१ ते ४ | | २४५७ | १२४३ | १२१४ | २८० | ६५० | २०८७ |

उक्त वर्ग -१ ते वर्ग -४ मधील सरळ सेवा व पदोन्नती पदांचे संदर्भात शासनाने निश्चित केलेली शैक्षणिक अर्हता, व्यावसायिक अर्हता, अनुभव तसेच शासन स्तरावरून इतर महानगरपालिकेचा मंजूर सेवा प्रवेश नियमांमधील तरतुदीचे सूक्ष्म अभ्यासाअंती अमरावती महानगरपालिकेचा पदनामनिहाय सेवा प्रवेश नियम तयार करण्यात आलेला आहे. सेवा प्रवेश नियम व सेवांचे वर्गीकरण सामान्य प्रशासन विभाग द्वारे तयार करण्यात आलेल्या सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- २०२४ ला महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाचे, शासन आदेश, क्रमांक. एन .सी .ओ २०२० प्र . क्र.७१ (भाग- २) नवी- १४ 'दिनांक २८. ०४. २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेष कलम ४५२ च्या (अ-१) अन्वये, उपरोक्त प्रशासकीय विषय सर्वसाधारण सभेचे मंजुरीस्तव सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा व विषय समित्या अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजूर व कायम.

**स्वा./-**
**नगर सचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

**स्वा./-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.